## नियमित दिवाणी दावा क्र.८०/२०२० मधील निशाण २४ वरील आदेश

१. अर्ज व म्हणणे वाचले.

२. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली.

३. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

४. वादी यांचे अर्जातील कथनांप्रमाणे प्रतिवादी क्र.१ श्रीरंग भानुदास अंबुरे हे दि.३१.०५.२०२१ रोजी मयत झाले आहेत. त्यांना प्रतिवादी क्र.१/१ गंगुबाई श्रीरंग अंबुरे ही पत्नी या नात्याने आणि प्रतिवादी क्र.२ ते ६ ही मुले या नात्याने वारस आहेत. प्रतिवादी क्र.१ यांची मुले प्रतिवादी क्र.२ ते ६ हे पूर्वी पासून अभिलेखावर आहेत. परंतु, त्यांची पत्नी गंगुबाई श्रीरंग अंबुरे ही या कामी पक्षकार नसल्याने तिला प्रतिवादी क्र.१ यांचे वारस म्हणून सामील करणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्र.१ हे कोरोना काळात मयत झाल्याने व त्यावेळी लॉकडाऊन असल्याने, तसेच वादी यांना उपजिवीका भागविणेसाठी पुणे येथे जावे लागल्याने त्यांचेकडून प्रतिवादी क्र.१ यांचे वारस अभिलेखावर घेणेस विलंब झाला आहे. वादी यांनी हा विलंब जाणूनबुजून केलेला नाही. इतर प्रतिवादी यांनी अर्जास आक्षेप घेतला आहे. परंतु, वादी यांनी अर्जाच्या पुष्ट्यर्थ शपथपत्र दाखल करुन अर्जातील कथने शपथेवर कथन केली आहेत. अभिलेखातील निशाणी २८ वरील मृत्यू प्रमाणपत्र पाहता प्रतिवादी क्र.१ हे दि.३१.०५.२०२१ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. त्यावेळी कोरोना महामारीमुळे न्यायालयीन कामकाज बंद होते, ही बाब खरी आहे. त्यामुळे, वादी यांनी अर्जात नमूद केलेले कारण संयुक्तिक वाटते. वादी यांनी हा दावा मालकी हक्क शाबितीसाठी व निरंतर ताकिदीसाठी दाखल केला आहे. त्यामुळे, प्रतिवादी क्र.१ यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारसांविरुध्द दाव्याचे कारण पुढे सुरु राहते. त्यामुळे, प्रतिवादी क्र.१ यांचे वारस याकामी अभिलेखावर आणणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक व जरुरीचे आहे. त्याकरीता वादी यांचेकडून प्रतिवादी क्र.१ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होणे देखील गरजेचे आहे. सबब, मी खालील आदेश पारित

करीत आहे.

## आ दे श

१. वादी यांचा निशाण २४ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादी यांना मयत प्रतिवादी क्र.१ यांचे वारस अभिलेखावर घेणेसाठी झालेला विलंब माफ करणेत येत आहे.

३. मयत प्रतिवादी क्र.१ यांचे अर्जात नमूद केलेले वारस अभिलेखावर घेणेसाठी वादी यांना परवानगी देण्यात येत आहे.

४. वादी यांनी आज पासून १४ दिवसांच्या आत दाव्यामध्ये योग्य ती दुरुस्ती करणेची आहे व दाव्याची दुरुस्त प्रत अभिलेखावर सादर करणेची आहे.

-

Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2022.06.21 17:41:37 +0530

**दिनांक : २१.०६.२०२२** **(डी.एम.हिंग्लजकर)**

**ठिकाण : वडवणी.** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, वडवणी,**

**ता. वडवणी, जि.बीड.**

**Certificate**

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/order.

Sd/-
(Amol D. Mule)
Stenographer (Grade-3)
Civil Court Junior Division
Wadwani

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 21.06.2022 |
| Transcribed on | : | 21.06.2022 |
| Checked and signed on | : | 21.06.2022 |